दि. २३/१२/२०२०.

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतूरचंद कला, विज्ञान

व वाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

विषय:- अल्पसंख्यांक हक्क दिन अहवाल.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करतो की, शनिवार १९ डिसेंबर, २०२० रोजी अल्पसंख्यांक हक्क दिन राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला होता. यावेळी "भारतीय संविधान आणि अल्पसंख्याक हक्क" या विषयावर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शमशोद्दीन तांबोळी सर यांनी या वेबिनार मध्ये मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर उपस्थित होते. या वेबिनारचा प्रारंभ दु. २:१० वा. ऑनलाईन पध्दतीने करण्यात आला.

यावेळी ऑनलाइन वेबिनारचे संयोजक आणि राज्यशास्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे, महाविद्यालयाचे रजिस्टर श्री. अभिनंदन शहा सर उपस्थित होते. या वेबिनारला १७२ विधार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

अल्पसंख्यांकांचे हक्क हा जागतिक प्रश्न आहे. हा प्रश्न फक्त भारतापुरता मर्यादित नाही. विविध देशातील वेगवेगळे धार्मिक समूह हे अल्पसंख्यांक आहेत. भारत हा बहुधार्मिक, बहुभाषिक, बहुसांस्कृतिक देश आहे. भारतीय संविधान कर्त्यांना याची जाणीव होती. भारता मधील बहुसंख्याकांच्या हक्कां सोबत अल्पसंख्यकांच्या हक्काचे संरक्षण करणे हे प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे असे गौरवोद्गार डॉ. शमशोद्दीन तांबोळी सर यांनी काढले.

१९ डिसेंबर, २०२० रोजी अल्पसंख्यांक हक्क दिनाच्या निमित्ताने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ऑनलाइन वेबिनारचे

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शमशोद्दीन तांबोळी सर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर उपस्थित होते.

डॉ. शमशोद्दीन तांबोळी सर म्हणाले की, भारतामध्ये अनेक विविधता आहे. त्याच बरोबर मोठ्या प्रमाणात विषमता देखील आहे. त्यामुळे विविधता वृद्धिंगत करून विषमता दूर करणे आवश्यक आहे. प्राचीन भारताचे स्वतंत्र अशा आधुनिक राष्ट्रात रूपांतर करण्याचे आश्वासन आपण संविधानातून दिलेले आहे. आधुनिक राष्ट्राची काही मूल्ये असतात. भारताने धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याचा स्वीकार केलेला आहे.

भारतीय संविधानाने व्यक्तीला मुलभूत हक्कान बरोबर मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत कर्तव्य याची सुद्धा जाणीव करून दिलेली आहे. तसेच अल्पसंख्याक समुदायाला काही विशेषाधिकार देखील देण्यात आलेले आहेत. हे अधिकार व्यक्तीला देण्यात आलेले असल्यामुळे व्यक्तीला स्वीकारायचे किंवा नाकारण्याची मुभा आहे. असे प्रतिपादन डॉ. शमशोद्दीन तांबोळी सर यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

भारत हा धर्म प्रधान देश आहे. परंतु येथील राज्यव्यवस्था धर्मनिरपेक्ष आहे. भारतीय संविधानाने धर्मस्वातंत्र्य धर्माला नव्हे, तर व्यक्तीला दिलेले आहे. परंतु धर्मस्वातंत्र्य समजून घेणे आवश्यक आहे. भारतीय समाज धर्म स्वातंत्र्य समजून घेण्यास परिपक्व झालेला आहे, असे मला वाटत नाही. भारतीय संविधानाने व्यक्तीला धर्म स्वातंत्र्याबरोबरच वैयक्तिक स्वातंत्र्य दिले आहे. त्यामध्ये जीविताचा आणि वित्ताच्या संरक्षणाचा हक्क दिला आहे. अल्पसंख्यांकांना धार्मिक आचार, विचार, प्रचार आणि प्रसाराचे स्वातंत्र्य दिले आहे. तसेच भाषा, लिपी, संस्कृतीच्या संरक्षणाचे स्वतंत्र दिले आहे. अलीकडील काळात भारतामध्ये अल्पसंख्याकांना लक्ष्य केले जात आहे. वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून लव्ह जिहाद, करोना जिहाद असा अपप्रचार केला जातो आहे. यामधून मॉब लिचिंगचे प्रकार घडत आहेत. या विषयी डॉ. शमशोद्दीन तांबोळी सर यांनी चिंता व्यक्त केली.

जगातील कोणत्याही देशाच्या जडणघडणीत आणि विकासात अल्पसंख्यांकांचे योगदान हे महत्वपूर्ण आहे. याची नोंद घेतली गेली पाहिजे. भारतीय राज्यव्यवस्था धर्मनिरपेक्ष आहे. परंतु अलीकडील काळात धार्मिक, जातीय अस्मिता पुढे येत आहे. परंतु त्यापेक्षा आम्ही भारतीय समाज म्हणून पुढे आलो पाहिजे. भारतीयत्व हे संविधानात्मक

TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI
413 102
PUNE

असले पाहिजे. त्यामधून मानवतावाद जपला गेला पाहिजे. असा आशावाद डॉ. शमशोद्दीन तांबोळी सर यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, वैयक्तिक स्वातंत्र्य जितके महत्त्वाचे आहे. तितकाच मानवतावाद देखील महत्वाचा आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन मानवतावादाच्या मशालीने आपला समाज अधिक उन्नत आणि प्रगल्भ केला पाहिजे. विविध विचारधारा मध्ये मानवतावादाचा विचार मांडला गेला आहे. त्यामध्ये जैन धर्मियांनी जवळपास अडीच हजार वर्षापासून एका मूल्यांची पाठराखण केली. तो विचार म्हणजे अनेकांतवाद होय. तीर्थकारांनी अनेकांतवादाच्या विचार मूल्याने संपूर्ण समाजाला एक दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. अनेकांतवाद खऱ्या अर्थाने व्यापक स्वरूपात समजून घेण्याचा मानवतावाद आहे. कोणत्याही प्रश्नाकडे पाहत असताना. त्याला अनेक बाजू असू शकतात. अगदी विरोधकांच्या मताचा सुद्धा सन्मान पूर्वक स्वीकार केला पाहिजे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी यावेळी व्यक्त केले.

भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये भौगोलिक, सामाजिक, भाषिक, सांस्कृतिक विविधता आहे. या विविधतेत एकात्मता आहे. यामध्ये आपण एक आहोत ही भारतीय नागरिकत्वाची भावना महत्त्वाची आहे. भारतीय समाज काय सांगतो आणि भारताचे संविधान काय सांगते. यामधून लोकशाही भारतामध्ये एक आदर्श समाज कसा असला पाहिजे. हा विचार राज्यघटनेच्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रुजवला आहे. असे मत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी व्यक्त केले.

भारतातील बहुसंख्याकांनी आपल्या खांद्यावर एक आदर्श समाज निर्माण करण्याची भूमिका जाणीवपूर्वक घेतली होती. अल्पसंख्याकांना जेव्हा सन्मानपूर्वक वागविले जाते. तेव्हा समाजातील अनेक प्रश्न सुटू लागतात. आम्ही म्हणतो तसे वागले, बोलले आणि विचार केला पाहिजे अशी भूमिका जेव्हा बहुसंख्यांक घेतात. तेव्हा समाजामध्ये एक मोठा प्रश्न तयार होतो. त्यामुळे दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर अन्याय होतो. बहुसंख्यांकवादाच्या नावाखाली अल्पसंख्याकांचे हक्क चिरडले जातात. जगभरातील अमेरिका, फ्रान्स, चीन या देशांमध्ये सुद्धा बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक अशी मांडणी होत आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी व्यक्त केले.

एक आदर्श समाज घडविताना आपल्याला भारतीयत्व जोपासावे लागणार आहे. भारतीयत्व हीच आपली खरी ओळख आहे. भारतीयत्वाच्या रूपाने आपल्याला पुढे जायचे

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

आहे. जगातील संपूर्ण मानव जातीला एक संदेश द्यावायचा आहे, कि आम्ही एक आहोत. प्रत्येक राष्ट्राच्या प्रगती आणि विकासात अल्पसंख्याकांचे योगदान हे अत्यंत मोठे,

लक्षणीय आणि नोंद घेण्यासारखे आहे. शेवटी राष्ट्र असतील किंवा नसतील, भाषा असतील किंवा नसतील. परंतु मानवता ही कायम असणार आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राजू पांडे यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार डॉ. कैलास मांटे यांनी मांडले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. अजित तेलवे सर, श्री अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले. तसेच प्रा. राहुल शाहा सर यांचे तांत्रिक मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

अल्पसंख्यांक हक्कदिन लिंक:
https://youtu.be/qTbwPbnHcXc

डॉ हनुमंत फाटक
राज्यशास्र विभागप्रमुख

TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI 413 102
★ PUNE ★